
दुरिताचें तिमिर जावो ।

# जवाहर वार्तापत्र

संपादक : प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी
कार्यकारी संपादक : प्रा.डॉ. संजय कुलकर्णी,प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार

अंक : ४ थे | वर्ष : २ रे | पान : ०७ | खाजगी वितरणाकरिता | वार : मंगळवार | दिनांक : २४ डिसेंबर २०१९




## जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थिनींची विशेष निवड

**अणदूर** दि. ११ डिसेंबर : शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित, जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींची टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च संचलित 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र' येथे एन. आय. यु. एस. अंतर्गत देशभरातील टॅलेंटेड विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून यासाठी भारतातून 30 विद्यार्थ्यांची निवड झाली असून यामध्ये, मराठवाड्यातून दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थिनी अणदूर ता. तुळजापूर येथील जवाहर महाविद्यालयातील आहेत. या महाविद्यालयात बी.एस्सी. प्रथम वर्षात शिकत असलेल्या कु. मुळे नेहा नागनाथ आणि कु. पिंजारी रिझवान महंमद या विद्यार्थिनी असून यांना थोर शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश



वडगावकर (एन.सी.एल.पुणे), सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा.डॉ. अजित फडकुले, संस्थेचे सचिव सि.ना. आलुरे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्याहस्ते गौरविण्यात आले. मुंबई येथील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१९ या कालावधीसह यापुढील प्रशिक्षणाच्या नियोजित कालावधीमध्ये चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये मूलभूत संशोधन कसे करावे, संशोधनाची आवड निर्माण व्हावी, मूलभूत संशोधनाचे कौशल्य अवगत व्हावे यासह इतरही महत्वपूर्ण वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे. या निवडीबदल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रसायनशास्त्र मानवी जीवनाचा अविभाज्य घटक - डॉ. वडगावकर

**अणदूर** दि.११ डिसेंबर : रसायनशास्त्राशिवाय विश्व आणि विश्वामध्ये रसायनशास्त्र या शिवाय काही असू शकत नाही म्हणून रसायनशास्त्र मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे मत थोर शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश वडगावकर यांनी व्यक्त केले. ते अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित रसायनशास्त्र चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते.



शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संस्थेच्या षष्ठयब्दी वर्षानिमित्त शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर येथे रसायनशास्त्र विभागाच्या वतीने बुधवार दि. ११ डिसेंबर रोजी 'इमर्जिन्ग टेंड्स इन केमिस्टी स्कोप अँड फ्युचर' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर एन.सी.एल.पुणे तसेच प्रा.डॉ. अजित फडकुले संगमेश्वर कॉलेज,सोलापूर यांच्यासह फँटासी टेक्नॉ-लॉजीच्या मा.ज्योती तरंगे या प्रमुख मार्गदर्शकांसह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रसायन शास्त्र विभाग प्रमुख डॉ.एम.एम. लंगडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन या रसायनशास्त्र चर्चासत्राचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना 'इन प्लॉट ट्रेनिंग इंडस्ट्रियल प्लेसमेंट' याही विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. अजित फडकुले यांनी रसायनशास्त्रतील संकल्पना सुस्पष्ट करुन सांगितले. तर मा. ज्योती तरंगे यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी लागणाऱ्या 'सॉफ्ट स्किल' संदर्भात मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र घेणारे 'जवाहर' हे पहिले महाविद्यालय ठरले. या चर्चासत्रात तुळजापूर, उमरगा, लोहारा, उस्मानाबाद तालुक्यासह सोलापूर, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध महाविद्या-लयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहभागी झालेल्या विविध महाविद्या-लयातील व परिसरातील रसायनशास्त्र विषया-च्या पदवी व पदव्युत्तर महाविद्या-लयीन विद्यार्थ्यांची या चर्चासत्रास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान क्र. २ वर

पान क्र. १ वरुन

यावेळी संस्थेचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी यांनी आपल्या मार्गदर्शनात परिसरातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण व्हावे, यासाठी आपल्या महाविद्यालयाची स्थापना केली असून महाविद्यालयात आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन अशा उपक्रमांचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे सांगून या कार्यशाळेसाठी सर्वांना शुभेच्छाही दिल्या. या एकदिवसीय चर्चासत्र कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. स्नेहा शिंदे हिने केले तर प्रा.डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयतील या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अमोल पाचपिंडे आणि डॉ. गटलेवार डी.एन.यांच्यासह तासिका- तत्वावरील प्राध्यापक व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## थोरा - मोठ्यांचे विचार आत्मसात करावेत : पाटील



**अणदूर** दि.१९ नोव्हेंबर : स्वावलंबनाशिवाय स्वाभि-मानाने जगणे अशक्य आहे. विद्यार्थ्यांनी थोरा - मोठ्यांचे विचार आत्मसात करावे, आपला वेळ नाहक कामात न घालता पुस्तक वाचण्यात घालवा, असे मत उस्मानाबाद येथील माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवायोजना कार्यक्र-मांतर्गत इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे,सचिव श्री.सि.ना. आलुरे गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत मुख्याध्यापक श्री.नीलकंठ नरे, श्री.बाबुराव कुलकर्णी उपस्थित होते. याच कार्यक्रमात जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी उपस्थित होते. सि.ना. आलुरे गुरुजी यांनी इंदिरा गांधी यांचे जीवनकार्य सांगितले.सूत्रसंचालन प्रा. एम.बी. बिराजदार यांनी तर प्रास्ताविक जवाहर महाविद्या-लयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. आभार श्री. प्रवीण गुरव यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. उमेश सलगर, प्रा. सुर्यकांत आगलावे, प्रा. मल्लीनाथ लंगडे, प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. धनंजय गटलेवार, प्रा. एस. व्ही. राजमाने आदींनी पुढाकार घेतला.

## विनोबा भावे जयंती संपन्न

**अणदूर** दि. ११ सप्टेंबर : जवाहर महाविद्यालयात विनोबा भावे यांची जयंती साजरी करण्यात आली. 'विनोबा भावे' यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.



त्यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. चनशेट्टी म्हणाले की, विनोबा भावे यांना पहिले सत्याग्रही म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सेवाग्राम आश्रमामध्ये त्यांनी भंग्याचे काम केला. मैला डोक्यावरुन वाहून नेला. विनोबांनी पवनार या ठिकाणी आश्रम स्थापन केले, आईसाठी त्यांनी गीताई लिहली आणि वाचन केले. विनोबांना शिक्षकाबद्दल ही आदर होता. इंदिरा गांधीना त्यांनी सल्ला दिला आणिबाणीची कारणे समाजाला समजावून फक्त शिक्षकच सांगू शकतात.परिवर्तन फक्त शिक्षकच करु शकतात.'सर्व भुमी गोपालकी' च्या माध्यमातून भुदान चळवळ सुरु झाली. महीबूब नगर येथील एका जमीनदारानी ५०० एकर जमिन दान केली. ते भूमीहिन गोरगरिबांना वाटप करण्यात आले ते गांधीजींचे अनुयायी होते. अच्छे कर्म करो कर्म ही पुजा है. अस संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. एम.बी. बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्या- लयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जवाहर महाविद्यालयात नाट्य अभिनय कार्यशाळा संपन्न

**अणदूर** दि. १७ सप्टेंबर : जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०१९ ते शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०१९ या कालावधीत नाट्य अभियन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्य शाळेसाठी प्रशिक्षक म्हणून थिएटर अकादमी, कोल्हापूरचे मास्टर ट्रेनर मा. संजय हर्डीकर उपस्थित होते.

या कार्यशाळेत संजय हर्डीकर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभिनयाचे धडे देत अभिनयाच्या क्षेत्रात जाण्यासाठी वेगवेगळे अभिनय कशा प्रकारे केले पाहिजे याचे सअभिनय करुन दाखवले. वेगवेगळ्या भाव-भावना, क्रोध, दुःख आणि हास्य यात होणारे बदल विद्यार्थ्यांकडून करुन घेतले, धावा धावा माझे घर जळत आहे. एवढा मोठा साप असे अनेक शब्द, वाक्य देवून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.



या कार्यशाळेत विद्यार्थ्यांमध्ये आत्माविश्वास निर्माण झाला. विद्यार्थी या कार्य शाळेत रमून गेले. कार्यशाळा संपू नये असे विद्यार्थ्यांना वाटू लागले. या कार्यक्रमाचा समारोप समारंभ शुक्रवार दि. २०/९/२०१९ रोजी रसायन शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.मल्लिनाथ लंगडे यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न झाले.

कु. स्नेहा शिंदे, कु. अंजली बनसोडे, कु. सुषमा नवगिरे, कु. जयश्री शिंदे रवी निर्मले, संतोष चव्हाण, ओंकार करपे, यांनी अनुभव व्यक्त केला. समारोप प्रसंगी बोलताना नाट्य प्रशिक्षक संजय हर्डीकर म्हणाले की, खेड्यातील युवकांमध्ये बदल व्हावा म्हणून मी धडपडत आहे. स्वतःवर विश्वास ठेवा जीवनातला अर्थ प्राप्त होईल.या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार प्रा.डॉ. उमाकांत सलगर यांनी काम पाहिले. प्रा. प्रसन्न कंदले, प्रा.डॉ. मीना जाधव प्रा.डॉ. संजय कुलकर्णी, प्रा.डॉ. राजशेखर नळगे व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जवाहर महाविद्यालयात नॅक विषयी कार्यशाळा संपन्न




**अणदूर** दि. २६ नोव्हेंबर : जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिक्षणतज्ज्ञ डॉ. एन.एस. धर्माधिकारी पुणे हे उपस्थित राहून मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव माजी आमदार श्री. सि.ना. आलुरे गुरुजी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी उपस्थित होते.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. धर्माधिकारी म्हणाले की, नॅक म्हणजे सापशिडी आहे. चांगले काम केलात तरच यश मिळणार आहे. येणारे नॅक सोपे नाही. करा किंवा मरा अशी अवस्था होणार आहे. पूरक व मारक यांचा विचार करा, खोट बोला पण रेटून बोला हे आता चालणार नाही. मनाची आणि बुध्दीची बॅटरी चार्ज करा, अपयश येणार नाही. कॉलेजचे वेगळेपण काय आहे हे सिध्द करा. विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि संस्था यांच्यात समन्वय ठेवा. स्मार्ट व्हा. आज काय करता यावर यश अवलंबून आहे. नॅक चे पॅरामिटर महत्वाचे आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,रक्तदान शिबीर, शेतकरी मेळावा, योगा, आरोग्य इ. च्या माध्यामातून समाजाला काय तरी देण्याचे उपक्रम सातत्याने चालू ठेवा. तिहेरी तलाक, औद्यागिक, अर्थिक, राजकीय पर्यावरण, जी.एस.टी.अर्थिक मंदी ,३७० कलम, ३५ अ इ. बद्दल आवड निर्माण करुन अभ्यास, वाचन, चिंतन, मनन ,करायला सांगा. गुगल क्लासरुम, क्यु आर कोड चालू करा अशी खूप माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय समारोप करताना आलुरे गुरुजी म्हणाले शिक्षणातून माणूस घडला पाहिजे. देशातील नागरिक व विद्यार्थी कसा घडवायचा याचा विचार करा. 'सृष्टीकरता ईशप्यारे एक हो तुम एकहो' हा संदेश विनोबांनी दिला. आपणही संकल्प करा. समाज एकतेच्या सूत्राने बांधा. श्रेष्ठ आणि ज्येष्ठांचे आदर्श समोर ठेवून कार्य करा.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. विश्वास माने यांनी केला. सूत्रसंचलन व आभार प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. या कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## राजीव गांधी जयंती साजरी



**अणदूर** दि. २० ऑगस्ट : जवाहर महाविद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान व संगणक क्रांतीचे जनक स्व.राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, राजीव गांधी हे संगणक क्रांतीचे जनक आहे. मुलांच्या हातात आज जे मोबाईल आहेत. ते राजीव गांधी मुळेच. राजीव गांधीने पंतप्रधान असताना जी धाडशी निर्णय घेतले त्याचे आज परिणाम दिसत आहेत.


## जवाहर महाविद्यालयात 'क्रिएटीव्ह इंग्लीश क्लब" चे उदघाटन

**अणदूर** दि. ३० सप्टेंबर : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये दि. ३०




या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते. यावेळी सोमवंशी यांनी जागतिक पातळीवर 'फाऊंडेशन स्किल्स' या विषयावरील व्याख्यानाच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले. डॉ. सोमवंशी यांनी जागतिक पातळीवर व्यवसाय करताना संवाद कौशल्याचे महत्व सांगून सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच विद्यार्थ्यांनी ही कौशल्ये कशी आत्मसात करावी, याबद्दलही माहिती दिली. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना दररोज नवीन शब्द शिकण्याचे आवाहन केले. ज्यामूळे वर्षभरात तीन हजार सहाशे नवीन शब्द आपल्या शब्द साठ्यात वाढतील व त्यामूळे आपण जगात कुठेही कमी पडणार नाही, असे सांगून भाषेचे महत्व पटवून दिले. महाविद्या-लयातील इंग्लिश विभाग प्रमुख डॉ. अनिता मुदकण्णा, यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले,प्रा. विवेकानंद वाहुळे यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली तर डॉ. मानसी स्वामी यांना आभार मानले, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनुष्का मनशेट्टी या विद्यार्थिनीने केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्या- लयातील प्राध्यपक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जवाहर महाविद्यालयात म. फुले स्मृदिन साजरा



**अणदूर** दि. २८ नोव्हेंबर : जवाहर महाविद्यालय, अणदूर येथे म. फुले यांच्या स्मृदिना-निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनिल रजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना प्रा. डॉ. सुनिल रजपूत म्हणाले की, म. फुले हे महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग म्हणून ओळखले जातात. सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काय  फुले यांनी केलेले आहे. शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन चालत नाही. शिक्षणाशिवाय समाजाता परिवर्तन घडवता येत नाही. त्या काळात स्त्री शिक्षणापासून दूर होती. स्त्रियांनी शिक्षण घेण हे पाप समजल जात होते. अशा परिस्थितीत फुले यांनी भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरु केली. शिक्षिका म्हणून सावित्रीबाईना तयार करण्यात आले. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमढे रोवली गेली. म्हणून म.फुले ही क्रांतिकारक ठरले.

शिक्षणाच्या क्रांतीची ज्योत पेटविली. रात्र शाळेची स्थापना केली. अस्पृशांना शिक्षण दिले. समाजातील रुढी, परंपरा, अंधःश्रध्दा मिटविण्याचे महान कार्य म.फुले यांनी केले. पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. बाल सुधारगृहाची सुरुवात केली. तृतीय रत्न, छ.शिवाजी महाराजांचा पोवाडा, शेतकऱ्यांचे आसूड, सार्वजनिक सत्यधर्म सारखे महत्वपूर्ण ग्रंथाचे लेखन केले. दीनबंधू पत्रिकेतून कामगारांच्या समस्या मांडाल्या, कामगार चळवळ उभी केली. या उतुंग कार्यात सावित्रीबाईची समर्थ साथ लाभली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म.फुल्यांना गुरुस्थानी मानून प्रेरणा घेतली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन व आभार डॉ.एम.बी. बिराजदार यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षेकत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

***

## जवाहर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**अणदूर** दि. ६ डिसेंबर :  जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी ग्रामीण विद्या विकास उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. संतोष नरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्रा.नरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनात खडतर प्रवास करुन जन-सामान्यांच्या जीवनात नंदनवन फुलविले. बाबासाहेबांचे वडील रामजी यांनी त्यांच्यावर योग्य संस्कार केले. शेवटपर्यंत तू गरीब राहिलास तरी चालेल पण तू विद्यासंपन्न व्हांवे एवढीच माझी आकांक्षा आहे. रामजी आंबेडकर कबीरपंथी होते. घरी कबीरांचे भजन व्हायचे चांगल्या वातावरणाचे परिणाम बाबासाहेबांच्या बालमनावर झाले. म्हणून बाबासाहेब घडले. निर्व्यसनी राहिले. पुस्तकावर प्रचंड प्रेम असल्यामुळे ते अखंड वाचत राहिले. घटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. कर्माने बाबासाहेब आजही आपल्यात आहेत.



अध्यक्षीय समारोप जवाहर प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## संविधान दिन साजरा



**अणदूर** दि. २६ नोव्हेंबर : जवाहर महाविद्यालय अणदूर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रथमतः २६-११ ला दशहतवादी हल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दंजली वाहण्यात आली. संविधान दिनानिमित्त भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व संविधान प्रास्ताविकाच्या फलकाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते झाले. प्रमुख वक्ते राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. एन. एस. सोमगोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संविधानाच्या प्रास्तविकाचे वाचन डॉ. अनिता मुदकण्णा यांनी केले.

विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.प्रमुख व्यक्ते डॉ. सोमगोंडे या प्रसंगी बोलताना म्हणाले की, संविधानाची निर्मिती, रचना व जगात एक



उत्कृष्ट अशी भारताची राज्यघटना आहे. घटनेच्या माध्यमातून मतदा-नाचा अधिकार देण्यात आला. घटना मसुदा समिती तयार करण्यात आली. घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवड करण्यात आली. अथक परिश्रमाने भारतीय राज्य-घटना आमलात आली. जगा-तील सर्वात मोठी राज्यघटना म्हणून भारतीय राज्यघटनेचा उल्लेख होतो. अशी सविस्तर माहिती दिली.

पान क्र. ५ वर

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर देशाचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली म्हणून व्यवस्थित आचरणासाठी प्रत्येकाच्या घरात भारतीय राज्यघटनेची एक प्रत असावी त्याचा अभ्यास करावा. प्रत्येकाला हक्काची जाणीव आहे, हक्क बरोबर कर्तव्याची जाणीव ही असावी तरच आपला देश प्रगती पथावर जाईल. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सुर्यकांत आगलावे प्रा. डॉ. जी.बी.राठोड, यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन व आभार प्रा.डॉ. एम.बी. बिराजदार यांनी मानले.

## जवाहर महाविद्यालतात पूज्य साने गुरुजी जयंती साजरी



समाज जीवंत ठेवायचा असेल तर माणूस जीवंत ठेवला पाहिजे, माणूस जीवंत असेल तर माणूसकी जीवंत ठेवली पाहिजे, माणूसकी जीवंत ठेवायचं असेल तर संस्कृती जीवंत ठेवली पाहिजे. संस्कृतीची उत्पती संस्कारातून होते अणि संस्कार हे मातेच्या ममत्वात असते. मातृत्वाचे महन्मगल गीत गावून जगासमोर महान आदर्श पुज्य साने गुरुजींनी ठेवला आहे. ''श्यामची आई'' या पुस्तकाचे प्रत्येक घरात पारायण व्हायला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी जयंती दिनी विनम्र अभिवादन करताना केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते पूज्य साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य म्हणाले की, साने गुरुजींचे कार्य अनमोल आहे. आंतरभारतीयांच्या माध्यमातून एकता निर्माण करण्याचे कार्य पूज्य साने गुरुजींनी केलेला आहे. या कार्यक्रमास महाविद्यालतातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्रामात अणदूरचे ऐतिहासिक योगदान

**प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी**

**अणदूर** : २७ सप्टेंबर : रोजी जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' साजरा करण्यात आला. महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते 'स्वामी रामानंद तीर्थ' यांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहन करण्यात आले.

याप्रसंगी कु. प्रेरणा कांबळे या विद्यार्थीनींने आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी बोलताना म्हणाले की, इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाला. पण भारतात ५६५ संस्थाने होती ती विलीन व्हायला तयार नव्हती. या पैकीच एक हैद्राबाद संस्थानवर निजामाची राजवट होती. तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांना भारतात विलीन होण्याचे आवाहन केले. हैद्राबादचा निजाम तयार झाला नाही. निजामाविरुध्द लढा द्यावा लागला. लष्करी कारवाई करावी लागली. या लढ्यात गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग गुरुजी, बाबासाहेब परांजपे,



स्वामी रामानंद तीर्थ यांचे मोलांचे योगदान लाभले. विशेषत या लढ्यात अणदूरचे ऐतिहासिक योगदान लाभले आहे. अणदूरचे स्वातंत्र सेनानी वीरभद्र स्वामी यांनी आपल्या घरावर तिरंगी झेंडा फडकावत ठेवून निजामाविरुध्द लढा चालू ठेवला. संपूर्ण गावात तिरंगी झेंड्याची मिरवणूक काढण्यात आली. निजामाला ठणकावून सांगण्यात आले. आम्ही सर्व एक आहोत. मराठवाडा स्वतंत्र करण्यासाठी आम्ही आपले बलिदान देवू.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भागिनी शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## शिक्षण हे दळण नसून वळण आहे : गरुड




**अणदूर** दि. ७ जून : शिक्षकांनी अध्यपना-बरोबर अध्ययन करणे गरजेचे आहे, शिक्षकांच्या डोक्यात कल्पकता असल्याने आदर्श विद्यार्थी घडतो, त्यामूळे शिक्षण हे दळण नसून वळण आहे असे मत ज्येष्ठ सहित्यिक दिलीप गरुड यांनी व्यक्त केले.

अणदूर येथे जवाहर महाविद्यालयात महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, आप्पासाहेब भावे, प्रकाशभाई मोहाडीकर विचार संवाद यात्रेनिमित्त बोलत होते, यावेळी सर्वोदय मंडळाचे जयवंत मठकर, आबा कांबळे, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि.ना.आलुरे गुरुजी, डॉ. शिवचरण ठाकुर, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, युवराज मठकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या संवाद यात्रेमध्ये जयवंत मठकर, आबा कांबळे, सि.ना. आलुरे गुरुजी यांनी महात्मा गांधी, विनोबा भावे, आप्पासाहेब भावे, प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. स्वावलंबन, खादी वापरण्या संदर्भात या संवाद यात्रेत चर्चा करण्यात आली. या यात्रेनिमित्त गांधी विचारवंत सि.ना.आलुरे गुरुजी यांना खादीची शाल व गीता देऊन सन्मानित करण्यात आले, या प्रसंगी सर्वोदय मंडळाचे प्रकाशित साहित्य प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले तर सूत्रसंचलन व आभार प्रा. एम.बी. बिराजदार यांनी मानले. यावेळी जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे उद्घाटन

**अणदूर** दि. ४ ऑक्टोबर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद व जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आतंरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडाअधिकारी मा. श्रीमती भाग्यश्री बिले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, मैदानावर यशस्वी होण्यासाठी खेळाडूंनी परिश्रमपूर्वक नियोजन करुन मैदानावर उतरावे, जीवनात संघर्ष करीत खेळाडूवृत्ती जपावी. शरीराबरोबर मन बळकट करुन खेळावर प्रेम करावे.



आपला खेळ राष्ट्रासाठी निश्चितच मोलाचे सिध्द होणार आहे. अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी माजी क्रीडा संचालक मा. डॉ. जयकुमार बारंगुळे मा. श्री. काकासाहेब शिंदे,मा. श्री. नितीन बागल, प्रा. दासकर, डॉ. अंकुश कदम डॉ. उमाकांत सलगर व सर्व महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.अध्यक्षीय समारोप करताना डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, क्रीडाधिकारी श्रीमती भाग्यश्री बिले यांनी शिक्षण घेवून जीवनात यशस्वी झाल्या. त्यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. विद्यार्थ्यांनी आदर्श समोर ठेवून खेळल्यास निश्चित मार्ग मिळतो.या प्रसंगी उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व खेळाडू त्यांचे मार्गदर्शक उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा.शैलशे शाईवाले, प्रकाश भुरे. प्रा. जाधव चंद्रकांत गणेश सर्जे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन व आभार प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.

***

## संत गाडगेबाबा पुण्यस्मरण दिन साजरा

**अणदूर** दि. २० डिसेंबर : जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमीत्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रतिमेचे पूजन प्रा.डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले.



कुणी न रहावे खुळे-अडाणी,
शिक्षण घ्यावे व्हावे ज्ञानी,
यासाठी ही झिजते वाणी,
मी जातीचा धोबी देवा,धुईन कपडा मळलेला,
गोपाला गोपाला, देवकी नंदन गोपाला

ग.दि. माडगूळकरांच्या या कवितेच्या माध्यमातून संत गाडगेबाबा यांच्या जीवनाकार्यावर त्यांच्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त प्रा.डॉ.एम.बी. बिराजदार यांनी विचार व्यक्त केला.

या प्रसंगी बोलताना प्राचार्य म्हणाले की, संत गाडगेबाबांचे जीवन संघर्षमय आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा प्रत्येक युवकांनी घेणे गरजेचे आहे. स्वच्छतेतून समृद्धीकडे घेऊन जाणारा हा मार्ग उत्तम आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'मानव जीवन निर्माण' अभियान संपन्न

**अणदूर** दि. ७ डिसेंबर : तव्यावर पडलेला पाण्याचा थेंब जळून जातो. झाडाच्या पानावर पडलेला थेंब दवबिंदू बनतो आणि तोच थेंब शिंपल्यात पडला तर मोती बनतो. म्हणून मित्रांनो आपण मोती बनू या प्राचीन भारतीय संस्कृतीत गुरुकुलांत सर्व काम करावे लागायचे. कोणी श्रेष्ठ नाही. कोणी कनिष्ठ नाही.सगळे समानतेच्या कर्मात बांधले जायचे. समता नांदायची आज परिस्थिती बदललेली आहे. म्हणून जीवनात चांगल्याची संगत धरा असे आवाहन आचार्य आनंद पुरुषार्थी आंतरराष्ट्रीय प्रवक्ता आर्य समाज शाखा परळी यांनी केले.




जवाहर महाविद्यालय अणदूर येथे 'मानव जीवन निर्माण' याविषयावर व्याख्यान संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. मा. श्री. प्रतापसिंह चव्हाण, मा.श्री. घुन्नर गुरुजी, संस्कृत विभाग प्रमुख प्रा. सत्येंद्र राऊत, प्रा.डॉ. सौ. भारती एस.आर., प्रा.डॉ.सौ. जाधव एम.बी. ,प्रा.डॉ. एस.के. कुलकर्णी, प्रा.डॉ. सोमगोंडे एन.एस. उपस्थित होते. प्रतापसिंह चव्हाण यांनी सुंदर गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. 'सरळ मार्ग सोडूनी माणसा काट्यामध्ये शिरु नको', आई-वडिलांना तुच्छमानून अपमान त्यांचा करु नको. संसारामागे लागून भोग विलासी तू होऊ नको. हे गीत त्यांनी गायीले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा.डॉ. सौ.भारती एस.आर.यांनी केले व आभार प्रा. सत्येंद्र राऊत यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## डॉ. मीना जाधव यांचा सह्याद्री वाहिनीवर महाचर्चेत सहभाग




**अणदूर** दि. 13 सप्टेंबर : जवाहर महाविद्यालय, अणदूर च्या हिंदी विभाग प्रमुख डॉ.मीना जाधव यांनी सह्याद्री वाहिनीच्या 'शिक्षण व महिला' या विषयांच्या अनुषगांने झालेल्या महाचर्चेत सहभाग नोंदविला. दि. १३/०९/२०१९ रोजी संध्याकाळी ठीक ५ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम सह्याद्री वाहिनीवरुन प्रसारीत करण्यात आला. त्यामध्ये त्यांनी शिक्षण ही महिलांच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे या विषयी चर्चा केली.त्याचबरोबर जवाहर महाविद्यालय, अणदूर मध्ये मुलीबाबत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. मुलींच्या शिक्षणासाठी मुली, पालक, शिक्षक आणि समाजातील सर्वस्तरातून प्रयत्न झाले पाहिजे असेही त्या म्हणाल्या.

***

## जवाहर महाविद्यालयात क्रीडा दिन उत्साहात संपन्न

तुम्ही खेळाडू असाल तर सर्वांच्या स्मरणात रहाल. खेळामूळे आपल शरीर व मन सुदृढ राहील म्हणून फक्त मोबाईलवर गेम न खेळता मैदानावर घाम येईपर्यंत खेळत राहा. प्रत्येकाने स्वत : ला कसा फिट ठेवता येईल याचा कानमंत्र घ्या . असे मत प्रा. काकासाहेब शिंदे यांनी व्यक्त केले. ते जवाहर महाविद्यालयामध्ये आयोजित क्रीडादिनानिमित्त कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

अणदूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये 'राष्ट्रीय क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'सुदृढ भारत अभियानाचा' शुभारंभ करण्यात आला.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते तर रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त क्रीडा विभाग प्रमुख प्रा. काकासाहेब शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'मेजर ध्यानचंद' यांच्या जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रमितेचे पूजन करण्यात आले. विशेष म्हणजे उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यावेळी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त 'सुदृढ भारत अभियान' संदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दलची चित्रफीत दाखविण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी 'मेजर ध्यानचंद' यांच्याबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी प्रा. प्रसन्न कंदले, श्री. लक्ष्मीकांत भिसे, प्रा.डॉ. एस.आर.भारती, एन.एस.एस. विभागाचे प्रा. डॉ. राठोड जी.टी.डॉ. एस.के.कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस. एस. विभाग प्रमुख प्रा. एस.डी.आगलावे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. एम.बी. बिराजदार यांनी केले तर क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ. उमेश सलगर यांनी आभार मानले.

***

## आई मुलांच्या पंखात बळ देत असते : प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी



**अणदूर** दि. १५ डिसेंबर : आई मुलांच्या पंखात बळ देत असते. आयुष्याच्या सायंकाळी आई - वडिलांना प्रेम हवे असते. पण आज धावपळीच्या जीवनात आई-वडिलांना आपण विसरत चाललो आहोत. त्यांना वृध्दाश्रमामध्ये पाठवून जबाबदारीतून मुक्त होण्याची जीवन पध्दती आजच्या पिढी मध्ये अमलात येत आहे.

आदरणीय आलुरे गुरुजींच्या मातोश्रीने त्यांच्यावर केलेल्या संस्कारमुळे गुरुजी घडले, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यात महत्वपूर्ण योगदान देऊन आईचे कार्य पुढे नेत आहेत. असे विचार प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी लोकमाता अक्काच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करताना व्यक्त केले.

जवाहर महाविद्यालय अणदूर येथे कै. लोकमाता आक्का उर्फ लक्ष्मीबाई नागाप्पा आलुरे यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कै. लोकमाता आक्कांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. जवाहर वार्तापत्राच्या पहिल्या अंकात आदरणीय आलुरे गुरुजींनी आपल्या मातोश्री बदल व्यक्त केलेल्या भावना प्रा.डॉ. एम.बी. बिराजदार यांनी अभिवाचन करुन कै. लोकमाता आक्कांचा जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

***

## दिशा ठरवा, मार्ग सापडेल : ए.पी. आय सीमा चौधरी, मुंबई

**अणदूर** दि. ५ डिसेंबर : महाविद्यालयात नियमित उपस्थित राहून, नियोजन करुन अभ्यास केल्यास जीवनात निश्चित यश संपादन करता येते त्यासाठी विद्यार्थ्यांनी दिशा निश्चित करुन मार्गक्रमण केल्यास अनेक अडचणीवर मात करता येते. पदवी नंतर स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी दिशा ठरवा. आपल्याला मार्ग सापडेल. मी पुण्याची असून जवाहर महाविद्यालयात ग्रामीण भागात शिकले. हसत-खेळत मैदानावर व वेगवेगळ्या उपक्रमात भाग घेवून मनापासून पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर पोलिस भरती झाले. नंतर न थांबता स्पर्धा परिक्षा दिली .पी.एस.आय म्हणून सेवा केल्यानंतर ए.पी.आय. म्हणून मुंबई येथे कार्य करीत आहे. माझ्या जीवनाचा प्रवास थक्क करणारा आहे. याचे श्रेय शिक्षण प्रसारक मंडल, अणदूरच्या जवाहर महाविद्या-लयाला आहे. महाविद्यालयात वारंवार शिक्षण महर्षी आलुरे गुरुजी यांचे मार्गदर्शन व्हायचे, गुरुजींचा आदर्श माझ्या समोर आहे म्हणून जीवनात यशस्वी झाले. माजी विद्यार्थ्यी ए.पी.आय. सीमा चौधरी यांनी व्यक्त केले.



अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, जवाहर महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी म्हणून ए.पी.आय. सीमा चौधरी यांच्याकडे पाहिल्यानंतर निश्चितच गर्वाने मान ताठ होते.आज पदवी घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी हा आदर्श घ्यावा आणि जीवनात यशस्वी व्हावे.

या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते सूत्रसंचलन प्रा.डॉ. एम.बी. बिराजदार व आभार प्रा. सुर्यकांत आगलावे यांनी मानले.

## नाविन्याचा शोध घेत विज्ञान आत्मसात करा - डॉ. धर्माधिकारी

### जवाहर महाविद्यालयात विशेष चर्चासत्रासह विज्ञान मंडळाची स्थापना

**अणदूर** : दृष्टी असेल तर सृष्टी दिसेल, स्वतःचा आदर्श स्वतःव्हा, चांगले गुण आत्मसात करा, मोबाईलवर गेम्स खेळून जीवन घडणार नाही तर चांगले ॲप्स डाऊनलोड करुन घ्या. नवीन विज्ञान जाणून घ्या. कॉलेज-मधील शिपायापासून विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्यामध्ये समन्वय निर्माण करुन ज्ञान-विज्ञान आत्मसात करुन पुढे चला, असे मत शिक्षण तज्ञ डॉ.एन.एस. धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. ते अणदूर येथील जवाहर महाविद्यालयामध्ये विज्ञान मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अणदूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित, जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत विज्ञान मंडळाची स्थापना करण्यात आली.

ज्येष्ठ शिक्षण तज्ञ डॉ. एन.एस. धर्माधिकारी यांच्या हस्ते विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते.अध्यक्षीय समारोपा-मध्ये प्राचार्य डॉ. चनशेट्टी म्हणाले की, विज्ञानाचा वापर आपल्या जीवनामध्ये करा, गांधीजी म्हणायचे की, स्वावलंबी शिक्षण विद्यार्थ्यां-मध्ये उतरले पाहिजे. ज्ञान विज्ञान आत्मसात करुन जीवन जगण्याचे कौशल्य शोधा, दिशा द्या,विज्ञानाच्या माध्य-मातून समाजातील अंधश्रध्दा दूर करा असेही त्यांनी सांगितले. यावेळी विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रा.डॉ.डी.एस. सुर्यवंशी,प्रा.श्रीमती एम.एन. गडसिंग, प्रा.डॉ. ए.एम. पाचपिंडे,प्रा.डॉ.मलिनाथ लंगडे, प्रा.डॉ. विश्वास माने, प्रा.प्रसन्न कंदले, डॉ. एम.टि.मुसांडे, डॉ. एस.कांबळे, प्रा.डॉ. एस.एस. बाड, प्रा.डॉ. राठोड जी.टी. प्रा.सत्येंद्र राऊत, प्रकाश भुरे, प्रा. सोनाली जाधव, प्रा. चंद्रकांत जाधव, प्रा.नीता राजमाने, प्रा. चव्हाण, प्रा. पाटील, प्रा. एस.ए. वाकळे, यांची उपस्थिती होती. त्याच-बरोबर, विज्ञान निसर्ग मंडळाचे पदाधिकारी अंजली बनसोडे, प्रसाद काळे, मुर्षद दाऊद, रोहन वर्दे, रेश्मा गायकवाड यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये चैताली माशाळकर या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व पाहूण्यांचा परिचय कु. रेश्मा गायकवाड या विद्यार्थिनीने करुन दिला. शेवटी प्रा.डॉ. अमोल पाचपिंडे यांनी आभार मानले.

## अमरत्व प्राप्त करायचा असेल तर अवयव दान करा - डॉ. महिंद्रकर

**अणदूर** दि.17 सप्टेंबर : जवाहर कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे नेत्रदान व अवयवदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व प्रमुख पाहुणे डॉ. चक्रवीर महिद्रकर, नेत्रचिकित्सा अधिकारी सिव्हिल हॉस्पीटल उस्मानाबाद, कार्यधिकारी प्रा. आगलावे एस.डी., आरोग्य समिती प्रमुख प्रा. भारती एस.आर. उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना डॉ. महिंद्रकर म्हणाले की, जीवन जगत असताना अनंत अडचणी निर्माण होतात.



आज अनेक रुग्णांना नेत्रदानाची व अवयव दानाची आवश्यकता आहे. गरजूंना योग्य वेळी जर अवयव मिळाले तर त्यांचा जीव वाचेल. तुमचे नेत्र दुसऱ्यांना दृष्टी देवू शकतात, तुमचे अवयव एखाद्या मरणयातना भोगणाऱ्या रुग्णाला अमरत्व प्राप्त करु शकतात. माणूस मेल्यानंतर काही वेळात नेत्र व आपल्या शरीराचे रुग्णाला मॅच होत असलेले अवयव काढून रोपण करता येते. नेत्र दान, अवयवदान अत्यंत श्रेष्ठ दान आहे. नेत्रदान करुन दृष्टी द्या,अवयवदान करुन जीवदान द्या. असे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्राध्यापक,शिक्षकेत्त कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एम.बी. बिराजदार यांनी केले आभार प्रा. एस.डी. आगलावे यांनी मानले.

सहकार्य
वृत्त संकलन व छायाचित्र
प्रा. सुर्यकांत आगलावे
प्रा. प्रसन्न कंदले, श्री. दिलीप चव्हाण
अक्षरजुळवणी
सौरभ कुलकर्णी
(श्रीगणेश प्रिंटींग प्रेस नळदुर्ग)